# बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि. ०८ जुलै २०२२

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३६९/२०२२ भादंविसक ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २७/११/२०२० रोजी पासुन लग्नानंतर काही दिवसांनी ते दि. २३/०६/२०२२ रोजी पर्यंत वेळो वेळी फिर्यादीचे सासरी |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०८/०७/२०२२ रोजी १३.५४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सौ. अर्चना श्रीकृष्ण पामनाथ, वय- २२ वर्षे, रा. आय-२, घर नं. १००, जुना विडी घरकुल जवळ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) श्रीकृष्ण मोगलप्पा पामनाथ- पती, २) लक्ष्मीबाई मोगलप्पा पामनाथ- सासु, ३) मोगलप्पा बालप्पा पामनाथ- सासरा, ४) ललिता नरेश गुंजेटी- नणंद, सर्व रा. जुना विडी घरकुल, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीतांनी मिळुन फिर्यादीस तुझे आई वडीलांकडुन भांडवलाकरीता ५ लाख रुपये घेऊन ये मी कपडयांचा धंदा करणार आहे. तुला घरात नांदायचे आहे की नाही पैसे घेऊन आलीस तरच तुला तुझा नवरा आणि आम्ही व्यवस्थित सांभाळतो असे म्हणून फिर्यादीस जाचहाट, मारहाण, शिवीगाळी, दमदाटी केली आहे. तसेच दि. २३/०६/२०२२ रोजी आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीस तुला मी ऐवढे दिवस झाले तुझ्या आई वडीलांकडुन पैसे घेऊन ये म्हणून सांगतोय परंतु माझे तु ऐकत नाही, तु माझ्या घरात यायचे नाही, माझे सोबत नांदायचे असल्यास तुझ्या आई वडीलांकडुन ५ लाख रुपये घेऊन ये नाहीतर बघ, तु तुझ्या आई वडीलांकडे रहा, असे म्हणून फिर्यादीस हाताने चापटा मारुन शिवीगाळ केली आहे म्हणून. तपास:- पोना/ १०७२ चव्हाण |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३४९/२०२२ भादंविसक ३८५,५००, माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६७ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १६/०६/२०२२ रोजी दुपारी १२.०५ वा चे सुमारास, फिर्यादी हे घरी असताना, फिर्यादीचे मोबाईलवर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०८/०७/२०२२ रोजी १५.०२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | आनंद बाळकृष्ण अंबिलपुरे, वय- ४७ वर्षे, रा. १०३, राहुल नगर, कुमठे रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अनोळखी इसमाचे मोबाईल क्रं. +९१ ९५६६५२३२९१ २) +९१ ८४७६९०८११०, ३) +९१ ८८०१७४६८७२५४०, ४) +९१ ८७६८६५९८६४, ५) +८८०१७४६८७२५४०, ६) +९१ ७६०७६१४६९३ |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे मोबाईलवर वरील आरोपी अनोळखी इसम त्याचे वरील मोबाईल क्रंमांकावरुन फिर्यादीस तुमच्या मुलीने कर्ज घेतले आहे त्याचे ११,५००/- रु तुम्ही भरा नाहीतर मी तुमच्या मुलीचे फोटो अश्लिल फोटो तुमच्या सर्व मित्र व नातेवाईकांना पाठवुन तुमची बदनामी करतो म्हणून धमकी दिल्याने फिर्यादी यांनी मुलीच्या अकाऊंट डिटेल चेक केले असता, तेथे मुलीच्या नावे कोणतेही पैसे जमा झाले नव्हते. त्यानंतर सतत वरील आरोपीतांनी आठ ते दहा वेळा ऑनलाईन व्हॉटस ॲप व्दारे कॉल केला, त्याचे कॉल फिर्यादी यांनी रिसीव्ह केला नाही. त्यानंतर वरील आरोपीताने अश्लिल एडिटिंग केलेले मुलीचे फोटो, आधार कार्ड, पॅन कार्ड असे वरील आरोपीताने त्याचे वरील मोबाईल क्रमांकावरुन व्हॉटस ॲप मेसेज केला.<br>तरी वरील आरोपीत याने फिर्यादीच्या मुलीने प्रत्यक्षात न घेतलेले ११,५००/- रु हे कर्ज असे भसवुन त्या कर्जाची परतफेड म्हणून फिर्यादीस ११,५००/- रु ची मागणी करुन ते फिर्यादीने न दिल्याने सदरचे एडिटिंग केलेले फोटो फिर्यादीचे मित्र व नातेवाईक यांना पाठवून, फिर्यादीची बदनामी करण्याच्या उद्देशाने प्रसारीत केलेला आहे म्हणून. तपास:- पोनि - जगताप- ८३२९२९५०५१ |